# प्रभु तरुण

वर्ष ५५   अंक ११   मुंबई   १६ जुलै, २०२२   पाने ६   किंमत रु. १

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**   *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## जुलै झिम्मा

**—सुहासिनी कीर्तिकर**

मुंबईतला उन्हाळा म्हणजे अलीकडच्या काळात काहिली. जूनमध्ये पावसाची सर सरसरत आली की थोडं बरं वाटतं जीवाला. मग पावसाच्या सरींबरोबर झिम्मा खेळत सणवार येतात. पावसाळा म्हणजे कृषि संस्कृती असलेल्या आपल्या देशात (आणि इतरत्रही) संजीवनच. म्हणूनच बिरबलाने 'हे चार महिने पावसाळ्याचे वगळले तर वर्षात महिने किती?' - याचे उत्तर शून्य दिले होते. तुम्ही कवितावेडे असाल तर अनिलांचीही या संदर्भातली हिशोब करणारी कविता तुम्हाला आठवेलच. आठवतेय का? त्यांच्या 'धडकी' कवितेत ते म्हणतात,

'सत्ताविसांतून जाऊन नऊ
शून्यच राहिले बाकी
तर....?
चिंता जडून धडकी भरे'

वर्षाची एकूण नक्षत्रे किती! तर सत्तावीस. त्यातली नऊ नक्षत्रं पावसाची. तीच नाहीत तर बाकी शून्यच राहणार ना?

शून्याचा अर्थपूर्ण वापर त्याआधी काही आकडे घेऊन होतो. तसेच जीवनातलाही आनंद लुटण्यासाठी पावसाळी जुलै नटूनथटून येतो. आषाढी एकादशीला भक्तिपूर लोटतो पंढरीला. त्याची सुरुवात मी हा लेख लिहितानाच झाली आहे. निघाली की तुकारामांची पालखी. याच जुलै महिन्यात जे पाळतात त्यांच्यासाठी 'चातुर्मास' सुरू होतो. देव चार महिन्यांसाठी झोपायला जातात. कारण पाऊसदेव जागा असतो. तो 'निर्मिक' आहे. बरसात बहार आहे. आठवतेय मंडळी गझल? जी पाऊसकाळाचे सुंदर वर्णन करते?

'क्या भुरी भुरी छाई है
मैखाने पर घटा
यह ऋतही खुशगँवार है
साकी शराब ला....'

अर्थात जे चातुर्मास पाळतात; त्यांच्यासाठी शराब कुठून? त्यांच्यासाठी फुलपानांवर विसावलेले पावसाचे थेंबच शबाब! तेच आसासून प्यायचे डोळ्यांनी.

या पाण्याने संजीवन मिळते म्हणूनच जुलै हा सर्जनाचा महिना. शेती तर होतेच. पण काही हौशी मनं आपल्या छोट्या गॅलरीत, खिडक्यात छोटाश्या कुंडीत काही वेली लावतात. मला आठवते चांगलेच की माझ्या भावाने (सुनीलने) एकेकाळी घोसाळ्यांचे वेल चढवले होते. त्याची पिवळी फुलं खूप श्रीमंत वाटत. मग हलकेच येणारी दोडकी. इतके भरमार पीक की शेजारीपाजारी वाटून देखील वेलीवर ही लंबगोल बाळे तशीच नांदत. हलके हलके सुकून जात. मग आतल्या जाळीदार अस्तराचा वापर करायचा. शरदिनी डहाणूकर तर मला म्हणाल्या होत्या, ''याला परदेशात 'नॅचरल स्क्रबर' म्हणून खूप मागणी आहे.'' त्या अस्तराची खूप छान, सुबकशी पर्सही मी करून माझ्या वहिनींना दिली होती. (आत्ता त्याच गेल्या अलीकडे!) दोडक्याचे भरीत, भजी असे काय काय केले जाते. काही हौसेने कारल्याचा वेल लावतात. पावसातले असे हे सृजन शहरातही उमलते. जुलैमधली फुलं तर अगणित. मधुमालती, रातराणी, तगर अन् अशी कितीतरी फुले. जुलैमधले खास नजाकत असलेलं कोमल फूल म्हणजे जुई. जाईपेक्षा आकाराने लहान, पण दूधपांढरी, नाजूक, मंद सुवास असलेल्या जुईला महाकवी कालिदासाने युथिका म्हटले आहे. कवी अनिलांनाही ही जुई भावून गेली. जुईचे रूप कसे? - तर 'नितळ देखणे' त्यांच्या या ओळीच पहा ना

'कवळ्या फांद्यांचा लवचिक बांधा
पाचूच्या पानांत झाकून घेत
शुभ्र शुचितेची सौजन्यकांती
हिरवे लावण्य लेऊन येत.'

खरं तर रसिकांनी मूळातूनच ही 'जुई' कविता वाचली पाहिजे. तिच्या शुभ्रकांति सुगंधात हळूवारपणे वेढून घेत तिचा गजरा मुक्त केसांवर माळला पाहिजे. जुलै असा नैसर्गिक गंधभारित असतो हो -

असे जुलैमधले गंधभारलेपण आणखी एका फुलात आहे. फूल म्हणण्यापेक्षा एकत्रित फुलेच ती. आपली रातराणी हो. आता शहरांनी रातराणीला दूरच ठेवले आहे. पण माझ्या आठवणीत आहे बरं कुंपणालगतची ही मालन. जी. ए. कुलकर्णींनी लिहिलेले आठवतेय का? रातराणीजवळून जाताना ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रपटात मधेच एखादे दृश्य टेक्निकलर व्हावे, त्याप्रमाणे एक क्षण सुगंधी होत असे. त्या वेळच्या एका कल्पनेची मला आजही गंमत वाटते. त्यावेळी आपण रातराणी जवळून जात नसून आपल्या जवळून एक शूचिर्भूत स्त्री पुढे गेली, असेच वाटे.'... हे 'जी.ए.' जरा वाचनात येणे तुमच्या, तसं अवघडच. पण मराठी भावगीतांशी तर आपली लाडिवाळ मैत्री असतेच ना? मग आठवताहेत का या पुढील ओळी?

'रातराणीचा गंध दरवळे
धुंद काहीसे आतून उसळे
चंद्र लाभला वरती
खाली नक्षत्रांची वेळ'...

ही नक्षत्रांची पखरण होते ती जुलै महिन्यात. तशी याच महिन्यात बिनवासाची तगरही बहरते. काही चतुर फुलवाले (माळी) या तगरीच्या कळ्यांचेच मोगऱ्याची कळी भासावी असे गजरे गुंफतात. छान दिसतात ते; पण तगरीला सुगंध नाही. आमच्या दारी होती तगर. रात्री अभ्यास करताना खिडकीतून दिसायची. फुललेली. आभाळभर चांदण्या असाव्यात तशी. 'फुलवा'कार डॉ. शरदिनी डहाणूकरांनी याला 'नक्षत्रांची छत्री' अस्सेच नाव दिलेय. 'आठवणींतील कविता' मध्येही तगरीवरची कविता चिरंजीव झालीय... 'डौल नसुनी बेडौल मुळी नाही' हे तिचे वर्णन. कसे?.... तर माझ्यासारखे!

डौल पहायचाच असेल फुलांचा तर, जुलै आणि त्याच्या पुढील जोड महिन्यात कास पठारावर हिंडायला हवे. रानफुलेच फुले. मातीला रोमांच आल्यासारखी उतरलेली असतात. निसर्गाची मुक्त उधळण झालेली असते. पायांना निसर्गात फिरण्याचे वळण असेल तर कासच काय; सर्वत्र रानफुले आपले स्वागतच करतात. जुलैचे बोट धरूनच सोनटक्का बहरतो. सुगंधाची उधळण करतो. त्याच रंगाची पण जाड पाकळ्यांची सुगंधी फुले अनंत देतो. आमच्या दारी असलेले अनंताचे झाड फुलले की 'अनंत हस्ते' ही फुले अनेकांचे देव्हारे सजवायची. बकुळीसारखा अनंतही दुसऱ्या दिवशी सुगंध देत असतो. शप्पथ. दुसऱ्या दिवशीच कशाला; दुसऱ्या तासालाही आपला सुगंध आवरून घेत कोमेजणारे; पण फुलल्या घडीला 'सुगंध देणे हेच माझे कार्य' म्हणणारे इवलाले प्राजक्त फूल! झाडाखाली सडा पडलेला असला की संपूर्ण सकाळ सुगंधशूचित होऊन जाते. हे स्वर्गातले फुल. पांढऱ्या कोरीव पाकळ्या, केशरी देठ, मन पावन करणारा सुगंध आणि फुलतानाच मातीशी मिसळून जात सडा पाडणारी ही फुलं. हौसेने ओवून हार करताना दोराही केशरी करणारी. शंकर वैद्य प्रेम भावना कवितेतून मांडताना फार सुंदर असे हे प्राजक्ताचे ओवणे प्रतिमांकित करीत जातात...

असा हा जुलै महिना आपल्या मनाचा बंध केशरी करून टाकतो. सणवार जगण्यातला आनंद वाढवत असतात. सरींवर सरी येतानाच मनही चिंब होत असते. भक्तीचा अनोखा रंग जगण्याला मुलामा देत असतो. पाऊसकाळ म्हणून निसर्ग भोगण्यासाठी सहली निघत असतात. हिरवाईची कल्हई जीवनावर होत असते. उत्साह उसळी घेत असतो. अवघे जगणेच आनंदमयी होत जाते. निसर्ग, मन, भावना, कृती-वृत्ती यांचा सुंदर झिम्माच खेळला जातो. प्रत्येक वेळी नवा आनंद देणारा, निसर्गचक्रात सामावून घेणारा. 'प्रभुतरुण' हलके हलके शताब्दी वर्षाकडे सरकत आहे. अशावेळी वाचकमित्रहो, आपला साद प्रतिसादाचा झिम्माही असाच रंगू द्या. खरं की नाही?

*

कविता

## मुंबईचा पाऊस

पाऊस आला पाऊस आला
आला पाऊस आला
झाडे भिजली, अंगे भिजली
रस्ता ओला झाला
आला पाऊस आला ।।१।।
वेड्यावाकड्या रस्त्यामधुनी
गेली गाडी पाणी उडवूनी
रस्त्यावरील साऱ्या लोकांचा
एकच गोंधळ झाला
आला पाऊस आला ।।२।।
सोसाट्याचा वारा सुटूनी
गेल्या साऱ्या छत्र्या उलटूनी
आभाळातील काळ्या ढगांचा
गडगडाट फार झाला
आला पाऊस आला ।। ३।।
मुले खेळती पाण्यामधुनी
कागदाच्या बोटी सोडूनी
येरे येरे पावसा ऐसा
गजर मुखी हा झाला
आला पाऊस आला ।। ४।।

**-नंदकिशोर मु. कोठारे**

## आदरांजली

प्रसिद्ध वृत्तनिवेदक, अभिनेते श्री. प्रदीप भिडे यांचे दि. ७-६-२२ रोजी निधन झाले. श्री. सुभाष कोठारे यांचे ते जावई. मुंबई मराठी साहित्य संघाच्या अभिनय कार्यशाळेत त्यांचा सहभाग असायचा. अलीकडे ते प्रदीर्घ काळ आजारीच होते. पण त्याआधी दूरदर्शनवर अनुवादक म्हणून काम करताना माझ्याशी त्यांचा संपर्क असायचा. अतिशय सौम्य प्रवृत्तीचा, वाचनवेडा आणि अभ्यासू माणूस अशी त्यांची ओळख माझ्या स्मरणात राहील.

त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**- सुहासिनी कीर्तिकर**

# संकल्प

**-डॉ. सुमन नवलकर**

आज पंधरा ऑगस्ट. स्वातंत्र्यदिन. सकाळी सव्वासातलाच खाली रस्त्याच्या कोपऱ्यावर स्वातंत्र्यदिनाची खास गाणी सुरू झाली. खूप छान गाणी. देशप्रेमाने मन हेलावेल अशी. आपण भारतीय आहोत याचा अभिमान मनात रेंगाळावा अशी. सोनाली नेहमीप्रमाणेच लवकर उठली होती. झेंडावंदनासाठी शाळेत जायचं होतं ना? न्याहारी चाललेली असनानाच गाणी सुरू झालेली ऐकून तिने खिडकीतून खाली पाहिलं. पाऊस झिमझिमत होता आणि त्या दोघी पावसात भिजत लाऊड-स्पीकर लावलेल्या खांबापाशी उभ्या होत्या. झेंडावंदनाची चाललेली तयारी पाहात होत्या. झेंड्यासाठी खांब उभारला होता. खांबाभोवती पांढरी आणि केशरी फुलं आणि हिरवी पानं यांची तीन रंगी रांगोळी काढली होती. बाजूलाच एक टेबल मांडलं होतं. त्यावर शुभ्र कापड आंथरलं होतं. आता टेबलावर चॉकलेटसच्या पिशव्या, भेटवस्तूंची पुडकी आणून ठेवली जातील. झेंडावंदनाचा कार्यक्रम संपला की चॉकलेटस् आणि भेटवस्तू वाटल्या जातील.

''सोनाली, चल लवकर, तयार हो. बस येईल ना शाळेची?'' आईने आठवण केली. तशी सोनाली पटकन खिडकीतून आत वळली. गेल्या तीन-चार वर्षाच्या अनुभवाने तिला ठाऊक आहे, की गाणी जरी सव्वासातला सुरू झालीत, तरी ती स्वत: शाळेतलं झेंडावंदन उरकून घरी परत येईल, तरीही हे झेंडावंदन आटपलेलं नसणार. तिचा अंदाज खराच ठरला. ती साडेदहाला घरी परतली तरी हे रस्त्यावरचं झेंडावंदन सुरू झालं नव्हतं. सकाळी शुकशुकाट असलेल्या त्या जागेत माणसं मात्र बरीच जमली होती. मुलं तर चाळीस-पन्नास तरी असतील. कदाचित साठही. मुलांबरोबर आलेली मोठी माणसं आपापल्या मुलांची बोटं पकडूनच होती. बहुतेकांच्या अंगावर पांढरे कपडे होते. अनेक मुलांनी तिरंग्याच्या रंगांचे टी-शर्ट घातले होते. अर्थात हा सर्व हौशीचाच भाग होता. कारण ही गर्दी सोनालीच्या कॉलनीच्या मागच्या बाजूला असलेल्या वाडीतल्या रहिवाश्यांची होती. तशी गरिबांचीच.

सकाळपासून असलेल्या त्या दोघी लाऊड-स्पीकरच्या खांबापाशीच उभ्या होत्या. त्या बहुधा त्या वाडीतल्या नसाव्यात. स्टेशनपाशी असलेल्या झोपडपट्टीतून आल्या असाव्यात. सकाळी पावसात भिजलेले त्यांचे कपडे एव्हाना त्यांच्या अंगावरच सुकले होते. भिजून सुकलेले केस बोटं फिरवल्यासारखे अस्ताव्यस्त होते.

''या दोघी सकाळपासून इतके तास इथेच उभ्या आहेत? कपडे तर तेच आहेत अंगावर. इतके तास? त्याना भूक नसेल का लागली? मी सकाळी न्याहारी करून शाळेत गेले होते, तरी आता परत भूक लागल्यासारखी वाटतेय.'' सोनालीचं बोलणं ऐकून आईनेही खिडकीतून डोकावून पाहिलं.


तेवढ्यात गाणी थांबली. लाऊड-स्पीकरवर कोणाचं तरी नाव पुकारलं गेलं. त्यांनी गर्दीतून पुढे येऊन झेंड्याची दोरी सोडली. खेचली. फुलांच्या मधोमध उभारलेल्या खांबावरचा झेंडा सरसर खांबाच्या वरच्या टोकाला जाऊन फडकू लागला. टाळ्यांचा कडकडाट झाला. सर्वांनी मिळून राष्ट्रगीत म्हटलं. मग एका छोट्या मुलाने छानसं झेंड्याचं गाणं म्हटलं. मुख्य पाहुण्यांचं, अध्यक्षांचं अशी भाषणं झाली. एव्हाना मुलांची संख्या वाढली होती. सर्वांची नजर सकाळपासून मांडून ठेवलेल्या टेबलाकडे लागली होती. त्या टेबलावर आता चार-पाच मोठी पुडकी, छोटी चॉकलेटस्-पेपरमिंटस् असलेल्या काही पिशव्या असा सरंजाम दिसत होता. दुसऱ्याना मागे टाकून आपण पुढे घुसण्यासाठी मुलांमधे ढक्लाढक्ली, चेंगरा-चेंगरी सुरू झाली होती.

''सर्व मुलांनी रांग करा. रांगेत पुढे या. गोंधळ करू नका. रांग करा. सर्वाना सर्वकाही मिळणार.'' हातात माईक घेतलेला तरूण ओरडून सांगत होता. रांग कुठून करायची? पुढे कोणी यायचं? मागे कोण जाणार? वस्तू आणि चॉकलेट सर्वानाच हवं होतं. त्या दोघीही आता लाऊडस्पीकरच्या खांबाकडून पुढे येऊन गर्दीच्या कडेला उभ्या होत्या. ''वाडीतल्या नसणारच त्या. म्हणूनच घुसायचा धीर होत नसणार त्याना.'' सोनाली आईला म्हणाली. शेवटी आणखी दोघे-तिघे पुढे आले. मुलाना रांगेत उभं करायचा प्रयत्न झाला. एकेरी रांग होणं कठीणच होतं. शेवटी मुलांच्या उभं राहाण्यात बऱ्यापैकी शिस्त दिसल्यावर एका तरुणाने पुडकं उघडलं. आत वह्या होत्या. वही आणि चॉकलेट. तेही फुकट. वाडीतल्या मुलांसाठी ही मोठी पर्वणी होती. घुसाघुसी पुन्हा सुरू झाली.

ज्या मुलांबरोबर मोठी माणसं होती, त्यांनी हात पुढे करून आपापल्या मुलांसाठी वही-चॉकलेट मिळवलं. काही मुलं जरा मोठी होती. त्यांच्या उंचीचा फायदा त्याना हात पुढे करून वही-चॉकलेट मिळवायसाठी झाला. काही लहान मुलं तर पाठच्यांनी ढकलल्यावर आपोआप पुढे येत होती आणि पुढच्यांनी ढोसल्यावर आपोआप पाठी जात होती.

एक पुडकं- दुसरं पुडकं-तिसरं

(पान ५ कॉलम १ वर)



**या छायाचित्रात १८६७ मध्ये किल्ला पाडून झाल्यावर मुंबईची जी सर्वंकष वाढ सुरू झाली, त्यापैकी प्रमुख म्हणजे मुंबई विद्यापीठ, राजाबाई टॉवर, मुंबई उच्च न्यायालय दिसत आहेत. यांच्या मागील बाजूस रस्त्यापलिकडे दिसणारी सर्व बांधकामे किल्ल्याच्या आत होती. डावीकडील कोपऱ्यात जिथे फ्लोरा फाऊंटन दिसते आहे तेथेच किल्ल्याचा चर्च गेट होता. ( उज्ज्वला आगासकर यांच्या लेखातील छायचित्र)**

थोडं बोलू या

# ऐकावी कहाणी गाव्यातली

-श्रेया तळपदे

''क्या पता हम में है कहानी या है कहानी में हम...''

''लाल सिंह चड्ढा' या चित्रपटातील हे गाणं गायक मोहन कानून, प्रीतमने संगीतबद्ध केलेलं आणि या गीताचे शब्द आहेत अमिताभ भट्टाचार्यांचे हे गाणं मनाला भिडलं. यातील शब्द ऐकताना वाटलं खरंच आपण आणि आपल्या आसपास वावरत असलेल्या नसलेल्या अनेक लोकांमध्ये कित्येक गोष्टी दडलेल्या आहेत किंवा कित्येक गोष्टीत आपण दडलेलो असतो.

लेखक ही एखादी गोष्ट लिहितो तेव्हा तो त्याच्याच नकळत त्यांनी लिहिलेल्या गोष्टीत असतो तसंच त्याने लिहिलेल्या गोष्टीत असतो तसंच त्याने लिहिलेली गोष्ट त्याच्या मनातच म्हणजेच त्याच्यातूनच बाहेर पडलेली असते.

'पु.ल. देशपांडे' अगदी यांचं उदाहरण घ्यायचं झालं तर पु.ल.नी लिहिलेलं 'व्यक्ती आणि वल्ली' बघा ना यातल्या प्रत्येक वल्लीचं दर्शन घडवतांना पु.ल. स्वत:ही प्रत्येक गोष्टीचा भाग आहेत.

खरं तर या गाण्याचा हा शब्दार्थ म्हणजेच अगदी वरवरचा अर्थ आहे. भावार्थात शिरण्यासाठी या शब्दांच्या भावनांची खोली गाठावी लागेल. का कोण जाणे पण हे गाणं जसं मनाला भावलं तसंच जुनं एक गाणं ऐकलं की मन बैचेन होतं.

'भातुकलीच्या खेळामधली राजा आणि राणी, अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहाणी...

लहानपणी रेडिओवर बऱ्याचदा हे गाणं लागायचं; परंतु त्यातली दाहकता तेव्हा कळली नव्हती. आज जेव्हा सहजपणे आत्ताची पिढी आपल्या संसाराचा डाव स्वेच्छेने मोडते तेव्हा खूप त्रास होतो. अशा अनेक कहाण्या अधुऱ्या असतात. कधीकधी मला असं वाटतं की प्रत्येकाचीच कहाणी कुठे ना कुठे अधुरी असते...

अशाच कहाण्यांवर गाणी बनतात किंवा गाण्यांवर कहाणी. यातलं फक्त यमक जुळते असे नाही तर ते एकमेकांना पूरकही आहेत. असा अनुभव गाणी ऐकताना मला येत असतो किंवा गाणी ऐकताना माझं मन त्यातली कहाणी शोधत असतं म्हणूनही कदाचित मीही पूरकता अनुभवत असेन.

तेव्हढ्यात कानावर गाण्याचे शब्द पडले-

जिंदगी और कुछ भी नही तेरी मेरी कहानी है...

जुन्या गीतांपासून ते अगदी हल्ली-हल्लीच्या गीतापर्यंत माणूस कहाणीत अडकलेला आहे किंवा कहाणीतील गाण्यात का गाण्यातल्या कहाणीत? गोंधळ होतोय का हो?

जाऊ दे. नका अडकू या गोंधळात. आपण दुसऱ्या एखाद्या कहाणीवर बोलू या. अंहं. घाबरू नका. आता नाही पुढच्या महिन्यात थोडं बोलू या.

*

# मुंबई बदलते आहे...


-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर
बी. आर्क. (मुंबई), फोटोजरनॅलिस्ट

इ.स. १६६५ मध्ये मुंबई बेटे ताब्यात आल्यापासून ब्रिटिशांनी मधल्या मुंबई बेटावर महत्त्वाची कार्यालये बांधण्याचा सपाटा लावला होता. सारे महत्त्वाचे अधिकारी राहातील अशी मोठी घरे, आणि गव्हर्नर राहील असे 'बॉम्बे कॅसल' या सर्वांचे संरक्षण करू शकेल असा मजबूत व मोठा किल्ला बांधण्याचे काम इ.स. १७१५ पासून झपाट्याने सुरू झाले. या भक्कम किल्ल्याला मोजकेच दरवाजे ठेवले होते, आणि त्यावर सतत करडी नजर असे. उत्तरेच्या भिंतीमध्ये बझारगेट हा दरवाजा होता, दक्षिणेच्या भिंतीमध्ये अपोलो गेट नावाचा दरवाजा होता. किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या मोठ्या टाऊन हॉलसमोर वर्तुळाकार मोठे उद्यान होते. तेथून पश्चिमेकडे सरळ गेलेल्या रस्त्यावर जो दरवाजा होता, तेथून आल्यावर सेंट थॉमस चर्चला जाता येत असे, म्हणून त्याला चर्चगेट असे नाव दिले. किल्ल्याच्या पूर्व बाजूस समुद्र आहे, तेथे दोन दरवाजे होते, त्यांना मरीन गेट असे म्हणत.

फोर्ट जॉर्जच्या पूर्व भिंतीचा थोडासा भाग आजही उभा आहे. त्यात महाराष्ट्र शासनाची कार्यालये आहेत. तेथूनच मूळ किल्ल्यात जाणारे भुयार आहे व ते स्वत: पाहिल्याचे मला स्व. प्रमोदजी नवलकर यांनी सांगितले होते. या भुयाराचा दुसरा दरवाजा जनरल पोस्ट ऑफिसच्या आवारामध्ये सापडला आहे.

या मोठ्या किल्ल्यामुळे पुरेसे संरक्षण निर्माण झाले होते. परंतु इ.स.१७३९ मध्ये चिमाजी आप्पा पेशवे यांनी चढाई करून पोर्तुगिजांना हरवून वसईचा किल्ला जिंकला. त्यामुळे घाबरून जाऊन मुंबई फोर्टच्या दक्षिणेच्या अपोलो गेटपासून पश्चिमेच्या चर्चगेटपर्यंत व तेथून उत्तरेस बझारगेटच्या पूर्वेपर्यंत, असा ३० फूट रुंद व २० फूट खोल असा सलग खंदक खणण्यास ताबडतोब सुरुवात केली. हा खंदक खणून १७४३ मध्ये पाण्याने भरला. मात्र या पाण्यामुळे किल्ल्यात रोगराई वाढली.

सन १८१८ मध्ये पेशव्यांचा पाडाव झाला. ब्रिटिशांना प्रबळ शत्रू उरला नाही. त्यामुळे १८५५ नंतर फोर्टची थोडी तटबंदी पाडली. परंतु नंतर सर बार्टल फ्रियर यांनी हुकूम दिला व १८६५ नंतर १८६७ पर्यंत फोर्टच्या सर्व तटबंदी पाडून सर्व खंदक बुजवून टाकले, तसेच नवे रस्ते तयार करून व पूर्वीचे रस्ते रुंद करून शहराचे रूप बदलण्यास सुरुवात केली. आज आपण मुंबईचे जे रूप पहातो त्याला असलेली ही भक्कम किल्ल्याची पार्श्वभूमी नजरेआडच गेलेली आहे!



**चर्चगेट स्टेशनच्या पूर्व बाजूस उभी असलेली, पश्चिम रेल्वेच्या मुख्य कार्यालयाची सुंदर इमारत**

**पालखी ज्या गावावरून पंढरपूरला जाते त्या गावांची नावेसुद्धा अत्यंत अर्थपूर्ण आहेत**

१) आळंदी- पालखी आळंदीतून (वद्य ।।९।।) निघते. आळंदी म्हणजे आत्मानंद. पालखीचा प्रारंभ आत्मानंदातून होतो.

२) पुणे- पालखी पुण्यात येते. पालखीबरोबर निघालो की जन्मजन्मांतरीची पापे नष्ट होऊन पुण्य प्राप्त होते. (भवानी पेठ, बुरडाच्या पुलाकडील पालखी विठोबा मंदिर, पुणे या ठिकाणी पालखीचा दोन दिवस मुक्काम असतो.)

३) दिवेघाट- नंतर पालखी संवत्सर ग्राम ऊर्फ सासवड या क्षेत्राकडे निघते. सासवडला जाताना दिवेघाटातून म्हणजे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी या अष्टांगयोगाच्या आचार दिव्यातून जावे लागते.

४) सासवड- वड म्हणजे सप्तचक्र. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, आज्ञा व शून्यचक्र या सप्तचक्रांची जागृती ही जीवनाची गरज आहे व ती जागृती प्राणायामाने होते. प्राणायाम म्हणजे श्वासावर नियंत्रण, श्वासावर ताबा म्हणजे सासवडचा मुक्काम व परमार्थाचा मार्ग सोपान होऊन सोपानदेवांच्या समाधीचे दर्शन घ्यावे.

५) जेजुरी- नंतर पालखी जेजुरीला येते. ज = जितेंद्र, जोरी = जास्त त्रास न घेणे. म्हणजेच जो जास्त त्रास न घेता इंद्रियांना जिंकतो तो आनंदी होतो.

६) वाल्ह्या- भर दुपारी वाल्ह्यात येते. येथे दुपारचा मुक्काम असतो. भर तारुण्यात माणसाने वाल्हे = कोमल, प्रेमळ, जिव्हाळासंपन्न झाले पाहिजे. (वाल्ह्यात वाल्मिकी ऋषींच्या

(पान ६ कॉलम २ वर)

नवलCURRY

# आनंदकंद...

**सौ. मुकुला प्रदीप नवलकर**

हल्ली बाजारात जाऊन खरेदी करण्याची, तितकीशी निकड असत नाही. पण एक काळ असाही होता की दरदिवशी ऑफिसनंतर मार्केटमध्ये फेरी असे. काही आणायचे आहे का? असं आपलं उगीच विचारायचे आणि पर्स घेऊन बाहेर पडायचे.

नवथर वय...खिशात स्वकमाई !

घरचे वातावरण स्वतंत्र आचारविचारांना मुभा देणारे, अर्थात मर्यादा ओळखून, म्हणूनच समंजस.

घरात हौसेमौजेचे अप्रूप आणि जबाबदारीची जाणीव या दोन्हींचे अगदी मनापासून कौतुक अन् प्रोत्साहन. त्यात हा असा फुललेला बाजार...

लहानसानं ते भलंमोठ्ठं, रंगबिरंगी, चमकतं धमकतं आणि खुणावणारं, अगदी ठासून भरलेलं. तऱ्हेतऱ्हेचे जिन्नस अशा आकर्षक खुबीने मांडलेले की, तुम्ही तिथे थांबणार आणि रमणारच. वस्तू हातात घेणार, भाव विचारणार, घासाघीस करणार आणि गरजेचे नसतांनाही पैसे खर्चून पुन्हा कसं स्वस्तात पडलं,म्हणून खूष होणार.

अशाच एका वळणावर ती असायची, दुकानाच्या पायरीजवळ बसलेली. चापूनचोपून लुगडं नेसलेलं. डोक्यावरचा पदर कमरेला खोचलेला. गळ्यात डोरलं, कानानाकात शोभेलसं. हातात काचेचा चुडा, कपाळावर कुंकवाचा ठसठशीत टिळा. सावळा रंग, अटकर बांधा आणि तोंडभर हसू. ते हसूच, पहिलं दिसायचं. मग दिसायचं पुढ्यात पसरून ठेवलेलं काही..बाही.

'घ्या की ताई,' म्हणत ती सगळ्या वस्तूंची जंत्री सांगायची. मधूनच एखादी उचलून दाखवायची.

किंमत सांगून वर पुन्हा, 'ताई, तुम्हाला येवढेच लावीन,' म्हणत हसायची.

बाजूलाच झोपलेल्या दुपट्यावरच्या बाळाला वारा घालायची अन् मागे बसून आपसात खेळणाऱ्या दोघांना उगा दटावायची.

अधीमधी फडक्यात गुंडाळलेला भाकरतुकडा त्यांना भरवायची.

मीसुद्धा तिथे जरा जास्तच रेंगाळत असे. कारण छोटेछोटे आणि नेहमी लागणारे, तरी सदा वेळेला न सापडणारे असे साहित्य असायचे

तिने दर सांगावा आणि मी अर्ध्यावरून बोली लावावी. मग तिने भाव थोडा कमी करावा आणि मी मात्र अडून बसावं ..असं काही वेळ, दोघींनी एकमेकींना जोखावं, मग तिने नमतं घ्यावं. तिच्याशी असा झिम्मा खेळून आणि काहीना काही तरी विकत घेऊनच मी निघाले की, ती पदर कानावरून पुढे ओढत हसूनच म्हणायची, 'या ताई. म्होरच्या टायमाला आणून ठिवतो तुम्हाला पायजेल ते. खोटी नाय करणार.'

अशी बरीच वर्षे झाली. जगण्यातील व्यवहारात अडकून मार्केटमध्ये जाणे थांबले. आधुनिक सुविधांमुळे माणसांचा संपर्क तुटला, तर तिची भेट कुठुन होणार? चूल मूल, नोकरी संसार यात वय वाढलं. बरेवाईट अनुभव गाठीशी आले.

कल्पनेतील जगाशी फारकत घेत वास्तव स्वीकारले तेव्हा, मी आणि माझे... यापलीकडचे जग, तेथील माणसे, त्यांचे जीणे... याचे भान आले त्याचवेळी पुन्हा तिची गाठ पडली.

उलटून गेलेल्या काळाने आपल्या खुणा, दोघींच्याही देहावर रेखल्या होत्या. तरी ती नव्याने भेटली की मी त्यावेळी कात टाकली होती, नक्की नाही सांगता येणार.

पण मी पाहिले, तिनेही बघितले, तेव्हा दोघींच्या चेहऱ्यावर हसू पसरले. ते हसूच बरेच काही सांगून गेले. खूप छान वाटले.

वस्तूंचे भाव विचारण्याआधी, मी तिची खुशाली विचारली. मूलंबाळं, घरसंसार यांची चौकशी केली. तिनेही आपलेपणाने तसाच प्रतिसाद दिला.

दोन तीन वस्तू, ज्या मी वरचेवर खरेदी करत असे, त्या पिशवीत घालून तिने पिशवी माझ्यापुढे धरली अन् मोकळं हसून म्हणाली,

''तुम्ही द्याल ते घेईन, मागणार नाही.''

माझं पांढरपेशी चांगुलपण, अध्यात्मिक उंची गाठत उफाळून आलं. मी पर्समधून मूठ भरून नोटा तिच्यापुढे धरल्या.

ती पुन्हा मोकळं मोकळं हसली अन् म्हणाली, ''नगं नगं,...येवढं त्याचं मोल न्हाईच. उगा कशापायी ओझं? माऊलीच्या किरपेने, सगळं बेजवार पार पडलं. लेकरं कामधंद्याला लागली. आम्हां म्हाताऱ्यांना असं कितीसं लागतं? तरीही हातपाय मारत राहिलं पाहिजेल, म्हणून लावतो धंदा कधीतरी. बाकी आता गावाला जाऊन राहायचं म्हणतो आमी माळकरी. आमच्या वाडवडिलांनी, पंढरीची वारी कधी चुकवली नाय. आता आमी पण तीच वाट धरावी, हे बेस.''

एकादमात तिने तिच्या आयुष्याचा लेखाजोखा मांडला आणि तेव्हा मला जाणवलं की, हेच ते, हेच ते उपजत शहाणपण आणि ते तर नेमकं टिपायचं असतं कारण ते कधीच विकत मिळत नाही.

या दुनियेच्या बाजारात, किंमत मोजून माल खरेदी करता येतोच; पण डोळसपणे आणि खुल्या दिलाने अवलोकन केले की विकाऊ नसलेले अमूल्य असे बरेच काही विनामूल्यही मिळविता येते.

मी मुकाट्याने मूठ पुन्हा पर्समध्ये मोकळी केली.

आता माझ्या नीट लक्षात आले होते की, माणूस म्हणून आब राखून जगण्यासाठी लागणारं आवश्यक तेवढंच तिचं जग आहे.

जड्व्याळ तत्त्व, बोजड आचारसंहिता, मी आणि इतर.. अशी जीवघेणी स्पर्धा हे तिच्या गावीही नाही. मी मनातून पार खजील झाले.

आपल्याकडे अगदी हव्वे ते भरभरून... ओसंडून वाहते आहे आणि तरी त्यातही आपण कोरडेच आणि ही ओंजळभर सुखातही सचैल न्हाते आहे.

सुखं,सुखं म्हणजे तरी नक्की काय असते? आहे त्याचं मोल जपत, नाही त्याची खंत न करता, न दिसणारे, पण देणारे हात... सदा स्मरून, येणारा दिवस आनंदात पार पाडायचा इतकंच. किती साधं, किती सोपं आणि सहज जगणं.

आयुष्याचा हा रंगबिरंगी मीनाबाजार! मोहक आणि संवेदक. तऱ्हेतऱ्हेने आकर्षक आणि नानाप्रकारे खुणावणारा.

इथे सहजतेने रुळायचे; पण बंधनात रेंगाळायचे नाही.

इथे डोळाभर पहायचे; पण मुक्कामाला रहायचे नाही.

इथे मनभर रमायचे; पण मनकल्लोळात गुंतायचे नाही.

इथे येऊन रुजून उगवायचे, मोहरुन बहरायचे आणि तृप्तीने दरवळायचे.

काळजातून अंकुरलेली आणि जगण्यातून फुललेली ही जीवनकला.

खरंतर तिची पाळंमुळं माझ्यातही लपलेली आहेत. वरचा पालापाचोळा बाजूला सारून, खतपाणी घातले तर माझ्यातूनही उमलेलं अन् अशीच अंगभर फुलून, माझ्याही जीवनात परिमळेल.

सुख म्हणजे नक्की ही जीवनकला रुजवणं असते.

सुख म्हणजे नक्की त्या कलेची निगराणी असते.

सुख म्हणजे नक्कीच हा कळ्या पाकळ्यांचा फुलोरा असतो. या सुखांनो या.

जसं मनात आलं.. तसं माझं मलाच हसू आलं.

आजच्या फेरीत असेच काही बहुमूल्य सहजच हाती लागले आहे.

आज मला माझ्यातच हा आनंदकंद गवसला आहे. आता तो पुन्हा नव्याने रुजवून, निगुतीने जोपासायचा आहे. मग कृतार्थतेचा मळा तर फुलणारच ना!

*

कथा

# पुंगळी

**हेमंत तळपदे**

मुंबई उपनगरातील मिरारोड एक गजबजलेले स्टेशन. या नगरात बहुतांश वस्ती मिरारोड पूर्वेला वसली आहे. पश्चिमेला अजूनही मिठागरे दिसतात. पण सध्या ही मिठागरे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या मिरारोडच्या रेल्वे ट्रॅकला समांतर म्हाडाच्या इमारती आहेत. या इमारतीतील बी/८ इमारतीला राधा रमेश सातपुते आपल्या आईसोबत ३०० चौ. फूटाच्या ब्लॉकमध्ये रहाते. हा ब्लॉक तिच्या वडिलांनी १९८४ मध्ये विकत घेतला. पण पाच वर्षापूर्वी त्यांचे निधन झाले. आता राधाची आई फक्त पाच-सहा घरी स्वयंपाक करून राधाचे पोषण करत आहे. राधा दिसायला तशी उजवी. रंग निमगोरा पण संभाषणात चतुर. आता तर ती मिरारोडच्या महाविद्यालयात एस.वाय.बी.कॉम.ला शिकत होती. कॉलेजच्या सोशल गॅदरींगमध्ये ती नेहमी सहभागी असायची. मग कधी आनंद मेळाव्यात फूडस्टॉल लाव, कधी महिला कब्बडी संघात खेळ, यातच तिची ओळख आफताब कुरेशीबरोबर झाली. आफताब अभ्यासात हुशार. सध्या तो टी.वाय.बी.कॉम. मध्ये शिकत होता. ते १९९३चे वर्ष होते. आफताबला शानशोकीची आवड होती. स्वतःच्या मोटरसायकलीवरून तो राधाला फिरावयास नेई. त्याच्या वडिलांचे भंगाराचे दुकान होते. त्यास मिळकत चांगली होती. राधा व तो निरनिराळ्या हॉटेलमध्ये जात. त्यांचे बंध चांगले रुजले होते.

आता राधाची वार्षिक परीक्षा जवळ आली होती. ती अभ्यासात गढली होती. त्यामुळे तिचे आफताबबरोबर फिरणे कमी झाले होते. तिच्या आईला या मैत्रीची कल्पनाही नव्हती. आणि आई दिवसभर स्वयंपाक करून थकून घरी परतत असे. तिला गुडघेदुखीचा त्रास सुरू झाला होता.

एके दिवशी राधाला आफताबचा फोन आला. मला तुला ताबडतोब भेटायचे आहे. तू कॉलेजबाहेरील वडापावच्या गाडीजवळ भेट, असे त्याने सांगितले. राधा जरा गोंधळली. पण शेवटी अभ्यास बाजूला सारून ती आफताबला भेटण्यास कॉलेजला गेली. आफताब मोटारसायकलवर तिची वाट पहात होता. तो तिला घेऊन काशिमिरा येथे एका टपरीवजा हॉटेलात गेला. त्याचा चेहरा थोडा गंभीरच होता. नेहमीप्रमाणे काहीतरी जोक्स सांगून राधाला

(पान ५ कॉलम ३ वर)

(पान २ कॉलम ४ वरून)
पुडकं-वह्यांची पुडकी एकापाठोपाठ एक संपत होती. ज्याना अजून वही-चॉकलेट मिळालं नव्हतं, त्यांच्या चेहऱ्यांवर निराशा, उत्कंठा, घालमेल असे मिश्र भाव दिसायला लागले होते. हळूहळू उत्कंठा आणि घालमेल कमी होऊन निराशाच वाढीला लागली होती.

''आई, आता शेवटची दोनच पुडकी राहिलीत. मुलं तर जास्तच राहिलीत आई. पुरतील का गं त्याना त्या वह्या?'' सोनालीच्या प्रश्नावर आईने खिडकीतून डोकावून पाहिलं. ज्याना वह्या मिळाल्या होत्या ती मुलं गर्दीच्या पाठच्या बाजूला आपापल्या वह्यांवरची चित्रं, आतली पानं पाहात उभी होती. सकाळपासूनच्या त्या दोघी अजूनही चेंगराचेंगरी, ढकला-ढकली करणाहया मुलांच्या बाजूला उभ्या होत्या. या गर्दीत त्यांचे कोणी माय-बाप, भाऊ-बहीण नव्हते. पण आशा तर त्यांनाही होती. तेवढ्यासाठी तर त्या सकाळी सव्वासातपासून येऊन थांबल्या होत्या.

''शाळेत जात असतील का गं त्या?'' सोनालीने आईला त्या दोघी दाखवल्या. ''शाळेतच जात नसतील तर वही त्यांच्या काय कामाची?''

''शाळेत जात नसल्या तरी वही हवी असणार त्याना. वहीवरचं चित्र, आतली पांढरी पानं, त्या पानांवरच्या ओळी, बरोबर मिळणारं ते छोटंसं चॉकलेट. ते तर सर्वानाच हवंसं वाटतं ना सोनाली?''

शेवटचं पुडकं उघडलं. वाटता-वाटता वह्या संपल्या. मुलं अजूनही शिल्लक होती. आणखी पाच-दहा मुलाना चॉकलेटस् मिळाली. मग चॉकलेटस् ही संपली. मुलं अजूनही शिल्लक होती. ''सर्वांना वस्तू मिळणार आहेत. नीट रांगा लावा.'' असं खात्रीपूर्वक सांगणारे आयोजक हळू-हळू गर्दीबरोबर पांगले. काहीही न मिळालेली मुलं खांदे पाडून, निराश होऊन वाडीच्या दिशेने निघाली. 'आता कदाचित घरी जाऊन हट्ट करतील. कदाचित त्यांचे आई-बाबा त्याना म्हणतील, बावळटच आहेस. साधं पुढे होऊन एक वही आणि एक चॉकलेट मिळवता आलं नाही तुला? किंवा कोणाचे आई-वडील दुकानातून घेऊनही देतील त्याना तसलीच वही आणि एखादं चॉकलेट,' सोनालीच्या मनात आलं.

त्या दोघी अजूनही गेल्या नव्हत्या. आता पुढे येऊन झेंड्याच्या बाजूला मांडलेल्या टेबलापाशी उभ्या होत्या. रिकाम्या पुडक्यांकडे पाहात होत्या. एखादी वही आत राहिली असेल तर मिळेल आपल्याला, अशा खोट्या आशेत. दुसरीने तर चॉकलेटची रिकामी पिशवी चाचपूनही पाहिली.

''आई, तू इथे खिडकीत उभी राहा. त्या दोघींकडे लक्ष ठेव. त्या जायला लागल्या तर त्यांना हाका मारून छुत्-छुत् करून थांबव आई. मी आलेच.'' सोनाली आतल्या खोलीकडे जात म्हणाली.

सोनालीच्या शाळेत आज रंगीत स्केचपेनचं पाकीट आणि चित्रकलेची वही असं सर्वांना वाटलं होतं. सोनालीने पटकन दोन्ही वस्तू उचलल्या. आईकडून डब्यातली दोन चॉकलेटस् मागून घेतली. आई चॉकलेटस् देईपर्यंत खिडकीतून खाली पाहिलं. दोघींमधली छोटी रडत होती. मोठी तिचे डोळे पुसत होती. तिला समजावत होती. तिचा हात धरून घरी चलण्यासाठी खेचत होती. पण छोटी तिथून हलायला तयार नव्हती.

सोनाली भरभर जिने उतरून खाली पोहोचली. दोघींच्या हातात दोन चॉकलेटस् दिली. छोटीच्या हातात वही दिली. मोठीच्या हातात स्केचपेन्सचं पाकीट दिलं. दोघी सोनालीकडे पाहातच राहिल्या. ही कोण मुलगी येते काय आणि आपल्याला हे छान-छान देते काय.

''हे तुम्हाला. शाळेत जाता का?'' सोनालीच्या प्रश्नाला दोघींनीही मान आडवी हलवली. ''शाळेत जायला हवं. लिहा-वाचायला शिकायला हवं. मग तुम्हाला एका वहीसाठी, एका चॉकलेटसाठी इतके तास उभं राहावं लागणार नाही. तुम्हाला चांगलंसं काम मिळेल. तुमच्या मेहनतीच्या पैशांनी तुम्ही हे सर्व विकत घेऊ शकाल.'' दोघींच्या चेहऱ्यावर फुललेलं हसू पाहून सोनालीलाही खूप आनंद झाला. आई वरून खिडकीतून पाहात होती. सोनाली घरी आल्यावर आईने विचारलं, ''काय बोलत होतीस ग त्यांच्याशी?''

सोनालीने सांगितल्यावर आई म्हणाली, ''वा आजीबाई, कुठे शिकलात एवढं शहाणपण?''

सोनाली म्हणाली, ''आई, खरं तर मला ती वही खूप आवडली होती. वहीवर सैनिकाचं चित्र होतं. मला ते पाहून माझ्या दुसऱ्या वहीत काढायचं होतं. स्केचपेनं पण खूप छान-छान रंगांची होती. पण हे सर्व तर तुम्हीही मला घेऊन द्याल. रांगेत उभं न राहाताही मला मिळेल हे सर्व. पण आई, त्या दोघी मी शाळेत जायच्या आधीपासून तिथे उभ्या होत्या आई. त्याना कोण देईल हे सर्व?''

संध्याकाळी सोनाली आई-बाबांबरोबर फिरायला गेली, तेव्हा आई-बाबांनी तिला तशीच सैनिकाचं चित्र असलेली चित्रकलेची वही आणि तसंच छान-छान रंगांच्या स्केचपेन्सचं पाकीट घेऊन दिलं.

'मोठं झाल्यावर कोण होणार?' ह्या प्रश्नाचं उत्तर सोनाली रोज नव्याने ठरवत असते. कधी तिला डॉक्टर व्हावंसं वाटतं, तर कधी टॅक्सी-ड्रायव्हर व्हावंसं वाटतं. कधी तिला अंतराळवीर व्हावंसं वाटतं, तर कधी शाळेत शिक्षिका. पण आज मात्र तिने पक्कं ठरवलं, की मोठेपणी आपण कोणीही झालो तरी देशातल्या अशिक्षित लोकांसाठी, गरिबांसाठी काहीतरी करायचंच. असं काहीतरी करायचं, की ज्यामुळे देशातल्या प्रत्येक मुलाला चित्रकलेची वही, साधी वही, स्केचपेनचं पाकीट, चॉकलेट एवढं तरी मिळायलाच हवं. कोणावरही तासंतास उभं राहायची आणि नंतर निराश होऊन घरी जायची वेळ येता कामा नये. बस, इतकं तरी करायचंच. इतकं तरी करायचंच.

मो.८७७९१९४०४२
९९६९०२८९६७
ईमेल: suman.navalkar@gmail.com

(पान ४ कॉलम ४ वरून)
हसवणारा आफताब थोडा बेचैनच होता. राधाला त्याचे नवलही वाटले. पण ती गप्प राहिली.

हॉटेलात पोहोचल्यावर आफताबने २ आमलेट ६ पावांची ऑर्डर दिली. व मिनरल वॉटरही मागवले. तो राधासमोर न बसता तिच्या जवळच बसला. त्याने राधाकडे पाहिले. तिचा चेहरा प्रश्नांकित होता. तो सावरला व राधाला म्हणाला, ''राधा तू माझी जिवाभावाची मैत्रीण व प्रेयसी आहेस. काहीही झाले तरी मी तुझ्याशीच निकाह करणार आहे. पहिले तर आपण तुझ्या धर्मानुसार प्रथम लग्न करू. माझ्या आईवडिलांनाही तू पसंत आहेस. तुला माहीत आहे की मी बाबांचा एकुलता एक मुलगा आहे. बाबांचा भंगाराचा धंदा मी सांभाळावा अशी त्यांची इच्छा आहे. पण माझी स्वप्ने वेगळी आहेत. मला भंगाराच्या गोदामात जीवन सडवायचे नाही. मी एक आणि श्रीमंत माणूस म्हणून जगणार आहे. माझ्या ओळखीच्या मित्राने एक कामगिरी माझ्यावर सोपविली आहे. त्यासाठी मला ३ कॉलेज युवतीची गरज आहे. मी फातिमा व सरलाला तयार केले आहे. आता तिसरी मुलगी म्हणून मला तुझी मदत हवी आहे तू ती करशील ना?

आफताबचे बोलणे ऐकून राधा मनोमन थोडीशी सुखावली. त्याने आज निकाहाची गोष्ट पहिल्यांदा स्पष्टपणे सांगितली होती. ती म्हणाली, ''आफताब मदत म्हणजे नक्की काय?' यावर आफताब सावधपणे पुढे सांगू लागला. ''राधा, येत्या एप्रिल महिन्यात आमच्या संघटनेने मुंबई, सुरत, अहमदाबाद व पुणे येथे बॉम्बस्फोट करण्याचे ठरविले आहे. या मिशनमध्ये माझ्यासह एकूण २० जण गुंतले आहेत. पण पोलिसांचा पहारा कडक असल्यामुळे हे बॉम्ब आम्ही मुलींकडून वाहनात दडवणार आहोत.'' हे ऐकताच राधा दचकली. ती म्हणाली, ''आफताब, वेडा आहेस की काय? यात मोठे रिस्क आहे. पकडलो गेलो तर फाशीही होईल.'' यावर आफताब विषादाने हसला व म्हणाला, ''राधा जीवनात लवकर श्रीमंत व्हायचे असेल तर कधीकधी रिस्कही घ्यावी लागते. तू घाबरू नकोस. तुला कोणीही पकडणार नाही. मी तुझ्या जवळपास माझी मोटरसायकल घेऊन असेन. तू फक्त हो म्हण. काम झाल्यावर आपल्याला ५ करोड मिळतील. मग आपण सुखाने लग्न करू. माझ्यावर विश्वास ठेव.''

राधा गांगरली. पण ५ करोड रक्कम ऐकताच तिला मोह आवरेना. त्यात आफताब तिलाही मनापासून पसंद होता. ती अर्ध्या तासात तयार झाली. आफताबने तिला घट्ट आलिंगन दिले. त्याच्या मिठीत ती सुखावली.

ठरलेल्या योजनेनुसार तो दिवस उजाडला. राधाला बोरिवली इंद्रप्रस्थ मार्केट, मालाट नटराज मार्केट व मिरारोड अस्मिता मार्केट जवळ बॉम्ब पेरायचे होते. आफताब तिच्या सोबतच होता. तिने काळा बुरखा घातला होता. ठरलेल्या वेळी तिने तिनही बॉम्ब त्या त्या जागी पेरले. आणि ठरलेल्या वेळी त्या बॉम्बचा स्फोटही झाला. मुंबई नव्हे तर सुरत, अहमदाबाद, पुणे येथेही बॉम्बस्फोट झाले. एकूण ११ बॉम्ब फुटले २२० माणसे मेली. तर ७५२ माणसे जखमी झाली. सर्वत्र हाहाकार माजला. मुंबई हवालदिल झाली.

येथे आफताब मात्र राधाला मिरारोडला सोडून गायब झाला. एक आठवडा मी भेटणार नाही. माझे सिमकार्डही बंद राहील. ७ दिवसांनंतर मी तुला फोन करेन मग आपण पुढचे ठरवू असे सांगून तो निसटला.

राधा दूरदर्शनच्या बातम्या पहात होती व पेपरही वाचत होती. पोलीसांचा तपास सुरू होता. पोलिसांनी सीसीटीव्ही छायाचित्रे तपासली त्यात राधा व आफताब दिसले होते. राधा बुरख्यात होती पण तिच्या चपलेवरून तिच्या एका मैत्रिणीने तिला ओळखले. पोलिसांनी राधाला कैद केले. पोलिसांचे खास पथक तिची चौकशी करू लागले. राधा चतुर होती. तिने सर्व आरोप नाकारले. पण पोलिसांनी पोलीसी खाक्या दाखवताच तिने आफताबचे नावही घेतले. तिचे आयुष्य उद्ध्वस्त झाले होते. पण आफताब मात्र चतुर निघाला. त्याच रात्री तो विमानाने राजस्थानला गेला व तेथून गाडीने तो पाक सीमेजवळ पोहोचला. व त्याच्या साथीदारांनी त्याला रात्रीच्या अंधारात पाकिस्तानात पोहोचवले.

राधाला न्यायालयाने १४ वर्षांची जन्मठेप सुनावली. आता तीन वर्षे उलटली होती. आफताबचा काहीही मागमूस नव्हता आणि शेवटी कारागृहात तिला समजले की आफताबने पाकिस्तानात एका मोठ्या मॉलमध्ये कपड्यांचे दुकान थाटले आहे. व तेथेच एका मुसलमान तरुणीशी त्याने निकाहही केला आहे. तो तेथे फार मजेत आहे.

झाले. राधा मनातून पार खचली. आफताबने तिचा खरोखर वापर केला होता. तिच्या खांद्यावर बंदूक ठेवून त्याने गोळी झाडली होती. व आपले लक्ष्य साध्य केले होते. राधा आता केवळ बंदुकीच्या गोळीची एक पुंगळी बनून जमिनीवर पडली होती. तिचे आयुष्य त्या पुंगळीसारखे दुर्लक्षित झाले होते. काळ आता त्या पुंगळीला आपल्या क्रूर पायाखाली तुडवत होता. राधा आतल्या आत केवळ तडफडत राहिली होती. पुंगळी चिरडली गेली होती.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## अभिनंदन

⁎ काव्यप्रेमी शिक्षक मंच, सिंधुदुर्ग तर्फे काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. त्यांचे परीक्षण प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी केले.

⁎ २० जून २२ रोजी डॉ. सुमन नवलकर यांचे आकाशवाणीवरील 'साहित्य सौरभ' कार्यक्रमात कथाकथन झाले.

⁎ सौ. वैदेही श्रेयस राणे यांना चार्टर्ड इंजिनियर म्हणून औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांकडून मान्यता प्राप्त झाली. त्यामुळे त्या फेलोशिप मिळण्यास पात्र झाल्या आहेत. फार कमी स्त्रियांना ही मान्यता लाभते. वैदेहीचे हे यश दुर्मीळ आहे.

⁎ ९ जून २२ रोजी 'पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन' या संस्थेचा शतकपूर्ती सोहळा झाला. महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. कोश्यारी प्रमुख पाहुणे होते. या सोहळ्यात 'पा. टि. वि. अ.'चे विश्वस्त म्हणून श्री. बन्सी धुरंधर यांचा सहभाग होता.

⁎ 'पाठारे प्रभु संस्कृती' या साईटवर ॲड केतकी जयकर यांचा सहभाग होता.

⁎ पाठारे प्रभु चॅरिटीज- पाठारे प्रभु चॅरिटीजचा २०२१-२२ यावर्षाचा अहवाल नेहमीची प्रथा पाळून सर्व प्रभुजनांपर्यंत वेळेवर पोहोचला. नेहमीप्रमाणे या अहवालात आधीच्या सभेचे वृत्त, पुढील सभेची माहिती आहे. या वर्षी साजरे झालेले उत्सव, ऑनलाईन बक्षिस समारंभ, वार्षिक हिशोब आणि त्याची तपासणी करण्याऱ्यांचा अहवाल इ. काटेकोरपणे दिले आहे. या अहवालामुळे विश्वस्त डॉ. श्री. प्रदीप विजयकरांचा साठावा वाढदिवस झाला ही आनंददायी बातमीही कळली. सर्वच कामात आणि आयोजनात वेळ आणि शिस्त पाळणाऱ्या चॅरिटीजचे मन:पूर्वक अभिनंदन.

⁎ प्रभुतरुणाचे मुद्रक श्री प्रमोद भोगटे यांना मुंबई मराठी पत्रकार संघाचे सन्माननीय सदस्यत्व मिळाले आहे. त्यांच्या वडिलांपासून ते निष्ठेने नवसंदेश हे पत्र चालवीत आहेत. प्रभुतरुणाचे मुद्रणही त्यांच्या वडिलांपासूनच स्नेहेश प्रिंटर्सकडे आहे. इतक्या वर्षांच्या साहचर्यामुळे त्यांना मिळालेला पुरस्कार आम्हाला आनंददायक वाटतो. अभिनंदन भोगटे.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

(पान ३ कॉलम २ वरून)

समाधीचे दर्शन होते.)

७) लोणंद- त्यानंतर पालखी लोणंदला मुक्कामाला येते. लो = देणे, आनंद = परमसुख. श्रीविठ्ठल भक्तीसाठी घरदार सोडून आलेला वारकरी भक्तिरसाने परमानंदी होतो व तो आनंद इतरांना देतो.

८) तरडगाव- जर तू ब्रह्मानंदाचा आनंद घेतला नाहीस तर तुला जीवनात रडावे लागेल. या सिद्धांताचे चिंतन करण्यासाठी पालखी तर + रड = तरडगावला येते.

९) फलटण- ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या। म्हणजे ब्रह्म हे पूर्ण सत्य आहे बाकी सारे जग फोलपटासारखे मिथ्या म्हणजे टाकाऊ आहे. हा अनुभव वारकऱ्यांना फलटणला आल्यावर येतो. हे जीवनाचे सत्य समजल्यावर

१०) बरड- संसारातील सुखदु:खादि द्वंद्वापासून मुक्त होतो. त्याचे जीवनरुपी क्षेत्र वासनेचे तृणांकूर न फुटणारे बरड जमिनीसारखे होते.

११) नातेपुते- नातेपुते या गावी इतर नात्याचा मोहातून मुक्त होऊन तो फक्त श्रीविठ्ठलाचा होतो.

१२) माळशिरस - माळ = साखळी + शिरस = ज्ञान = माळशिरस. पायी चालल्याने शारीरिक मुखाने नामस्मरण केल्याने वाचिक विठ्ठलध्यासाने मानसिक तपाबरोबर कीर्तन - प्रवचनाच्या श्रवणाने ज्ञानाची साखळी त्याला विठ्ठलरूप करते.

१३) वेळापूर- त्यानंतर त्यांचा मुक्काम वेळापूरात होतो. क्षणभरसुद्धा वेळ वाया न घालविता विठ्ठलभजन केले पाहिजे हे ज्ञान होते.

१४) वाखरी- वाखरीच्या मुक्कामी त्याची वाणी प्रासादिक व वाचासिद्ध होऊन.

१५) नंतर तो पंढरपूर जाऊन पांडुरंगमय होतो.

पांडुरंग... पांडुरंग साई विठ्ठल।

(संदर्भ:- वॉटस् ॲप)

⁎

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

०७-६-२२ कु. स्निती विद्याधर आगासकर, अंधेरी (पूर्व)

### नांदा सौख्यभरे

२७-५-२२ कु. भक्ती प्रणवेश धैर्यवान श्री. आदित्य खानोलकर (आं. ज्ञा.)

२२-५-२२ श्री. अभिषेक अलर्क देसाई कु. निकीता शरद राणे (आं.ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०५-६-२२ | श्रीमती मीना गिरीश नवलकर, | वय ७९, | जुहू |
| ०८-६-२२ | सौ. जना रवींद्र नवलकर, | वय ९६, | कांदिवली |
| ०९-६-२२ | श्रीमती शुभांगिनी चंद्रशेखर (बाबा) जयकर, | वय ८१, | अंधेरी |
| १४-६-२२ | श्रीमती सुनीता योगेशचंद्र आगासकर, | वय ८०, | अंधेरी (पूर्व) |
| १६-६-२२ | श्रीमती अरुणा सुचित कीर्तिकर, | वय ७६, | खार |
| १७-६-२२ | श्री. हरीश चंद्रकांत तळपदे, | वय ६७ | |
| १७-६-२२ | श्री. सुनील माधवराव धैर्यवान, | वय ७७, | खार |

## परीक्षेतील सुयश

**एस.एस.सी. (दहावी)**
श्री. अर्णव आलोक धराधर
९२.८ टक्के

**एच. एस.सी.(बारावी)**
श्री. आदित्य संजय विजयकर
८८.६७ टक्के

**बी.कॉम.**
कु. श्रद्धा दीपक धराधर
८८.८३ टक्के
कु. तनीशा नितीन व्यंकट देसाई
६८ टक्के
श्री. नील सतेज प्रफुल्ल राणे
६९.३५ टक्के

**एम. ए. (जॉग्रफी)**
कु. उंजल राजीव वेलकर
९५ टक्के

**बी.एस.सी. (आय.टी.)**
श्री. हर्ष अजय कोठारे सीजीपीए
७.९२ (दहापैकी)

**बी. कॉम (अकाउंटंसी आणि फायनान्स)**
श्री हर्ष राजेश देसाई ९४.८० टक्के

**बी. ए.**
श्री नील सतेज राणे
८.८०सीजीपीए (८४ टक्के)

**एमएससी (डाटा इंटलिजन्स अँड अप्लाईड इकॉनॉमिक्स)**
**यु.एस.ए., अरिझोना विद्यापीठ**
श्री. ऋषिकेश तेज वेलकर, ए ग्रेड,
८० टक्क्यापेक्षा अधिक

⁎

पाठारे प्रभु सोशल समाजाची अभंग यात्रा याही वर्षी ऑनलाईन साजरी होणार आहे. रविवारी दि. १७ जुलैला सायंकाळी सात वाजता होणाऱ्या या यात्रेचा अहवाल अर्थातच पुढील अंकी. शुभेच्छा.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67